
# तथागत गौतम बुद्धांना विनम्र अभिवादन!



महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म शाक्य गणात इ.स.पूर्व 563 मध्ये लुंबिनी येथे झाला. त्यांचे मूळ नाव सिद्धार्थ गौतम. जीवन जगताना त्यांनी आसपासच्या लोकांचे दुःख पाहिले आणि त्यांनी दुखाचे कारण शोधण्याचा निर्धार केला. सत्याच्या शोधात 6 वर्षे कठोर तपश्चर्या केल्यानंतर बोधगया येथे त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' म्हणून ओळखले जाऊ लागले.

गौतम बुद्धांनी जगाला शांती, अहिंसा, समता आणि करुणेचा संदेश दिला. त्यांनी चार आर्यसत्य आणि अष्टांगिक मार्गाची शिकवण दिली. मनुष्य प्राण्याला 'माणूस' बनवण्यासाठी त्यांनी आपले अवघे आयुष्य अर्पण केले. शेवटी कुशीनगर येथे इ.स.पूर्व 483 मध्ये त्यांचे महापरिनिर्वाण झाले.

बौद्ध पौर्णिमा (बुद्ध जयंती) हा गौतम बुद्धांच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या घटनांची आठवण करून देणारा पवित्र दिवस आहे. या दिवशी त्यांचा जन्म झाला, या दिवशी त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि याच दिवशी त्यांचे महापरिनिर्वाण झाले.

## गौतम बुद्धांचा मानवकल्याणाचा विचार

### भिक्खूसंघ: लोकशाहीचे आदर्श उदाहरण




भिक्खूसंघ म्हणजे गौतम बुद्धांनी स्थापन केलेला भिक्खू (संन्यासी) यांचा संघ किंवा समूह. भिक्खूसंघात सर्व जाती व पंथांच्या लोकांचे स्वागत केले जाई. भिक्खूसंघ हा केवळ धार्मिक संघ नव्हता, तर तो लोकशाही तत्त्वांवर चालणारा समुदाय होता. गौतम बुद्धांनी प्रत्यक्ष आचरणातून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, स्त्री-पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टीकोण यावर चालणारी मानवतावादी व्यवस्था उभारली, जी आजच्या लोकशाहीच्या मूलभूत तत्वांशी पूर्णपणे सुसंगत आहे.




**न जात्या ब्राह्मणो होति, न जात्या होति अब्राह्मणो; कम्मुना ब्राह्मणो होति, कम्मुना होति अब्राह्मणो।**
बुद्धांनी सांगितले कि, जन्माने कोणी ब्राह्मण किंवा शूद्र होत नाही; व्यक्ती ही कर्मामुळे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरते. बुद्धांनी सर्वांना समान मानले; जाती, जन्म किंवा संपत्ती याआधारित भेदभाव नाकारले. भारतीय संविधानातील कलम 14 ते 18 सर्वांना समतेचा अधिकार देते. दोन्ही ठिकाणी 'सर्व मानव समान' हाच मुख्य विचार आहे.




**'अत्त दीप भव':** बुद्धांनी सांगितले कुणावरही आंधळा विश्वास ठेवू नका, स्वत: विचार करा आणि ज्ञानाने प्रकाशमान व्हा. बुद्धांनी विचारस्वातंत्र्याचा आग्रह धरून लोकांना मानसिक गुलामीतून मुक्त केले. संविधानाचे कलम 19–22 आपल्याला विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा यांचे स्वातंत्र्य देते. दोन्ही ठिकाणी स्वतंत्र विचार आणि अभिव्यक्ती महत्त्वाची आहे.




**न हि वेरेन वेरानि, सम्मन्ति इध कुदाचनं; अवेरेन च सम्मन्ति, एसा धम्मो सनन्तनो.**
गौतम बुद्ध सांगतात की, वैराने वैर संपत नाही; प्रेमानेच वैर संपवले जाऊ शकते. मैत्रीने मन आणि करूणेने जग जिंकता येतं, हे बुद्धांनी कृतीतून दाखवून दिले. म्हणूनच कुख्यात दरोडेखोर अंगुलीमाल हा बुद्धांचा अनुयायी बनला. जीवन जगण्यासाठी बुद्धांनी 'पंचशील' (पाच नैतिक मूल्ये) सांगितली.

आजुबाजुला हिंसा आणि द्वेश वाढत असताना बुद्धांचा करूणेचा संदेशच आपल्याला तारू शकतो. लोकांमध्ये एकमेकांबद्दल आदरभाव असला तरच देशात एकजूट राहील, म्हणून भारतीय संविधानही आपल्याला बंधुतेने जगायला सांगते.




**बहुजन हिताय, बहुजन सुखाय**

‘आपण केवळ स्वतःसाठी नव्हे तर सर्व समाजातील लोकांच्या कल्याणासाठी कार्य करावे.’ गौतम बुद्धांचा जगाला दुखमुक्त करण्यासाठी न्यायाचा मार्ग दाखवला. सर्व गरीब, शोषीत, पिडीतांचे कल्याण व्हावे यासाठी संविधान सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचा आग्रह धरते.




गौतम बुद्धांनी भिक्खूसंघात महिलांनाही स्थान दिले (भिक्खूणी संघ). त्या काळात पुरूषांप्रमाणे महिलांनाही ध्यान, साधना आणि धर्मप्रसाराचे अधिकार देणे, हे एक क्रांतिकारी पाऊल होते. संविधानानेही स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क दिले आहेत.

## चार आर्यसत्य: बुद्धांनी सांगितलेला वैज्ञानिक दृष्टिकोण




जगात दुःख आहे, दुःखाला काहीतरी कारण आहे, ते कारण शोधता येऊ शकते. त्यानंतर दुःखापासून मुक्ती शक्य आहे, त्यासाठी ‘अष्टांग मार्गावर’ चालण्याची गरज आहे, असे बुद्धांनी सांगितले. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महिलांवरील हिंसाचार, गरीबी, निरक्षरता, जातीय-धार्मिक तेढ यांसारख्या विविध प्रश्नांची खरी कारणे शोधणे आणि ते प्रश्न सोडवणे हेच संविधानाला अपेक्षित वैज्ञानिक दृष्टिकोण आहे.




## दुःखमुक्तीचा मार्ग : भारतीय संविधान

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, “स्वातंत्र्य-समता-बंधुता ही मूल्ये मी फ्रेंच राज्यक्रांतीतून नाही, तर गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांकडून शिकलो”.**

गौतम बुद्धांनी जगाला दुःखमुक्तीचा मार्ग दाखवला - तोच मार्ग भारतीय संविधानही आपल्याला दाखवते. म्हणून भारतीय संविधानाची प्रभावी अंमलबजावणी झाल्याशिवाय देशातील जनतेला दुःखापासून मुक्ती मिळू शकणार नाही. ‘भवतू सब्ब मंगलम्’ म्हणजे ‘सगळयांचे कल्याण होवो’ हीच संविधानाची कामना आहे.

बुद्धांचा संदेश भिक्खूंनी गावोगावी-देशोदेशी पोहोचवला. हाच प्रबोधनाचा आदर्श घेऊन आपणही संविधानाचा विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवूया. आम्ही यासाठी प्रयत्न करत आहोत, आपणही सहभागी व्हावे, असे प्रेमपूर्वक आवाहन!




## चला, आपल्या कृतीतून तथागतांना वंदन करूया!

**या पत्रकाचे झेरॉक्स काढून किमान 10 घरांमध्ये वाटा किंवा आपल्या परिसरातील बुद्धपौर्णिमेच्या कार्यक्रमात हे पत्रक वाटा!**

**संविधान जागर अभियान**

निमंत्रक समिती: मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

samvidhanjagar
samvidhanjagar.org
samvidhan.jagar

स्वप्निल फुसे: 7972345764 | डॉ. श्याम मुडे: 9404708852 | श्रद्धा रेखा राजेंद्र: 9270478335 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739